दिनांक 01/12/2023

# प्रसिध्दी पत्रक

**आ.लो.से..डॉ.अरुण शंकरराव गवारे, वय 48 वर्षे, पद-पशुधन विकास अधिकारी, वर्ग-1,पंचायत समिती कन्नड ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडे रुपये 2000/- लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगरच्या जाळयात.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे कन्नड शहर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) |
| आलोसे यांचे नाव हुद्या व पत्ता | डॉ.अरुण शंकरराव गवारे, वय 48 वर्षे, पद-पशुधन विकास अधिकारी, वर्ग-1,पंचायत समिती कन्नड ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर रा. तिरुपती सुप्रीम इन्क्लेव्ह, जालाननगर रेल्वेस्टेशन छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 2000/- |
| तपास अधिकारी | श्री. गोरखनाथ गांगुर्डे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | दोन मयत शेळयांचे चेक देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी शासनाचे सबसिडीवर दोन शेळया घेतलेल्या आहेत. सदर दोन शेळया मयत झाल्याने त्यांचा इन्सुरन्सचा चेक देण्यासाठी आ.लो.से. श्री. अरुण गवारे यांनी रुपये 2000/- लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. अरुण गवारे यांनी तक्रारदार यांना रुपये 2000/- लाचेची मागणी केली परंतु त्यानंतर त्यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही. नमुद आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे कन्नड शहर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा.राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक गोरखनाथ गांगुडे, यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार दिगंबर पाठक, केवलसिंग घुसिंगे, शिरीष वाघ, चालक देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ऍप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8668752530

पोलीस उप अधीक्षक :- 8668752530


पोलीस उप अधीक्षक कार्यालय लाचलुचपत ब्युरो, छत्रपती संभाजीनगर

(गोरखनाथ गांगुर्डे)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर